# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 14.12.2025 वार- रविवार

---

**उद्घाटन**

पुण्यातील विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. पुण्याच्या विकासाला चालना देणाऱ्या एकंदर एक हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचा यात समावेश आहे.

**सवाईगंधर्व**

शास्त्रीय संगीत रसिकांची स्वरपंढरी मानल्या जाणाऱ्या 71व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची आज पुण्यात सांगता होणार आहे. गेल्या पाच दिवसांपासून महाराष्ट्रीय मंडळाच्या मैदानावर रंगलेल्या या स्वरांच्या महोत्सवात शास्त्रीय संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकारांबरोबरच नवोदित कलाकारांनी आपल्या कलेचं सादरीकरण केलं. सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात आज पंडित उपेंद्र भट, श्रुती विश्वकर्मा, अनिरुद्ध ऐताळ, सावनी शेंडे, यांचं गायन झालं. यापुढील सत्रात पंडित व्यंकटेश कुमार यांचं गायन, डॉ. एल शंकर यांचं व्हॉयलीन वादन होणार आहे, पंडित उपेंद्र भट, श्रीनिवास जोशी, आनंद भाटे आणि विराज जोशी यांच्या अर्घ्य या कार्यक्रमानं महोत्सवाची सांगता होईल.

**पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आज या महोत्सवात लहान मुलांसाठी सुलेखन कार्यशाळा, कथाकथन कार्यशाळा, अशा विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**टेलीमेडिसिन**

पुणे जिल्हा परिषदेच्यावतीने वेल्हे तालुक्यातील करंजावणे आणि खेड तालुक्यातील राजगुरुनगर इथं टेलीमेडिसिन केंद्र सुरू करण्यात आलं आहे. या केंद्रांच्या माध्यमातून रुग्णांना तज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधणं तसंच जटिल आजारांचं लवकरात लवकर निदान करणं शक्य होणार आहे. या सुविधेमुळे रुग्णांच्या वेळेची आणि पैशांचीही बचत होणार असल्याचं मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी म्हटलं आहे.

**स्किललॅब्स**

पुणे जिल्हा परिषदेच्या 30 शाळांमध्ये "स्किल लॅब्स" उभारण्यासाठी पुणे प्रिस्टीन रोटरी क्लब आणि पुणे जिल्हा परिषद यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रयोगशाळेतून विद्यार्थ्यांना प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, ब्युटीशियन, इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध 13 व्यावसायिक कौशल्यांचं प्रशिक्षण मिळणार आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.विजय भटकर यांच्या मार्गदर्शनातून हा उपक्रम राबवला जात आहे.

**पुणेमनपा**

पुण्यात कचरा संकलनासाठी महापालिका 340 छोट्या घंटागाड्या भाडेतत्त्वावर घेणार आहे. त्याचबरोबर 12 संगणक, आणि स्वच्छतेच्या कामांसाठी आवश्यक 11 यंत्रांचीही खरेदी केली जाणार आहे. यासाठी पुढच्या पाच वर्षांत 284 कोटी रुपयांच्या खर्चाला स्थायी समितीने मान्यता दिल्याचं महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितलं.

**उद्योजकता मेळावा**

स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया या सारख्या योजनांमधू केंद्र सरकार उद्योग उभारणीला चालना देत आहे, त्याचा लाभ तरुणांनी घ्यावा, असं आवाहन उद्योग मार्गदर्शक हर्षवर्धन रानडे यांनी नुकतंच पुण्यात केलं. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आयोजित उद्योजकता विकास मेळाव्याच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

**पुरस्कार**

पार्श्वगायिका सुनिधी चौहान यांना सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार 2025 नुकताच पुण्यात प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप होतं.

**विमानसराव**

हिवाळ्याच्या दिवसात धुकं असताना विमान उड्डाणं सुरळीत व्हावीत  यासाठी पुणे विमानतळावर काल संयुक्त सराव करण्यात आला. प्रतिकूल परिस्थितीत विमान तळावरील व्यवस्थापनात व्यत्यय येऊ नये आणि विमान उड्डाणांना उशीर होऊ नये हा या सरावाचा उद्देश होता. यामध्ये विमानतळावरील कर्मचारी, विमान कंपन्यांचे कर्मचारी, भारतीय हवाई दल, केंद्रीय औद्योगिक पोलिस दल, स्थानिक पोलिस, रिक्षा आणि टॅक्सी चालकही सहभागी झाले होते.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने कांदा, लसूण आणि टोमॅटोच्या भावात वाढ झाली. पालेभाज्यांची आवक वाढल्याने दर घसरले. फळ बाजारात पेरू, पपई, खरबूज, मोसंबी यांच्या भावात वाढ झाली. फुल बाजारात मागणी नसल्याने जवळपास सर्वच फुलांचे भाव खाली आले आहेत.

**पुणे ग्रँड चॅलेंज टूर**

जागतिक दर्जाची पुणे ग्रँड चॅलेंज टूर ही सायकल स्पर्धा पुण्यात येत्या 19 ते 23 जानेवारी या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेसाठी विविध देशातील 28 नामांकित संघांनी आपला सहभाग निश्चित केला आहे. ही स्पर्धा चार टप्प्यात एकंदर 437 किलोमीटर मार्गावर होणार आहे.

पुणे जिल्ह्यातील मुळशी, मावळ, पुरंदर, बारामती या तालुक्यात या सायकल स्पर्धेसाठी मार्ग तयार करण्यात येत आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 9 पूर्णांक 4 दशांश अंश तर कमाल तापमान 31 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या किमान तापमान 10 अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**